आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – दुपारी १.३० वाजता

९ ऑक्टोबर २०२३ – सोमवार

**ठळक बातम्या**

- पाच राज्यातल्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर/ छत्तीसगड मधे दोन टप्प्यात तर इतर राज्यात एकाच टप्प्यात मतदान

- मतमोजणी येत्या 3 डिसेंबरला होणार

- संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून चार दिवस इटली आणि फ्रान्सच्या दौऱ्यावर

- राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना आमदारांच्या अपात्रेबाबतच्या याचिकांची सुनावणी एकत्र करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे विधानसभा अध्यक्षांना निर्देश

**आणि**

- अफगाणिस्तान भूकंपात मृतांची संख्या २ हजार चारशेपेक्षा जास्त

<><><><><><>

**निवडणूक आयोगानं** आज राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड आणि मिझोराम या पाच राज्यांतल्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी नवी दिल्लीत पत्रकारपरिषदेत जाहीर केला.

छत्तीसगड विधानसभेसाठी दोन टप्प्यात मतदान होणार असून पहिला टप्पा ७ नोव्हेंबरला तर दुसरा टप्पा १७ नोव्हेंबरला होणार आहे. मिझोराममध्ये ७ नोव्हेंबरला तर मध्य प्रदेशमध्ये १७ नोव्हेंबरला, राजस्थानमध्ये २३ नोव्हेंबरला आणि तेलंगणामध्ये ३० नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

सर्व राज्यांची मतमोजणी ३ डिसेंबरला होणार आहे. २०२४ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी होणाऱ्या या शेवटच्या विधानसभा निवडणुका असल्याने त्यांना विशेष महत्त्व असल्याचं राजीव कुमार म्हणाले. या पाच राज्यांमध्ये मिळून विधानसभेच्या ६७९ जागा आणि १६ कोटी मतदार आहेत. यात सुमारे ६० लाख मतदार प्रथमच मतदान करणार आहेत. या राज्यांमध्ये १७ हजार ७३४ आदर्श मतदान केंद्रे असतील. सर्व मतदान केंद्रांवर खात्रीशीर किमान मूलभूत सुविधा उपलब्ध असतील. नागरिक कोणत्याही प्रकारच्या निवडणूक गैरप्रकारांची सी व्हिजिल ॲपद्वारे निवडणूक आयोगाकडे कडे तक्रार करू शकतात. प्रत्येक तक्रारीला १०० मिनिटांत प्रतिसाद मिळेल, असं कुमार यांनी सांगितलं. बेकायदेशीर रोकड, दारू, मोफत वस्तू आणि अंमली पदार्थांची सीमा ओलांडून होणारी कोणतीही हालचाल रोखण्यासाठी पाच राज्यांमध्ये ९४० हून अधिक आंतरराज्य सीमा तपासणी नाके उभारण्यात आले असल्यांचं देखील त्यांनी सांगितलं.

गेले ६ महिने या निवडणुकांसाठीची तयारी आयोगातर्फे होत होती. मतदारांना देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत आणि मतदार याद्या अधिकधिक बिनचूक करण्यासाठी केलेल्या उपायांची माहिती त्यांनी दिली….

**होल्ड ….. राजीव कुमार ….**

**<><><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आजपासून चार दिवस इटली आणि फ्रान्सच्या दौऱ्यावर जात आहेत. सर्वप्रथम ते रोम इथं इटलीचे संरक्षण मंत्री ग्विडो क्रोसेटो यांची भेट घेतील. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात ते फ्रान्सचे संरक्षण मंत्री सबास्टीयन

लेकोर्नु यांच्यासोबत पाचव्या वार्षिक संरक्षण संवादात भाग घेतील. दोन्ही देशांदरम्यान औद्योगिक सहकार्यासह व्यापक द्विपक्षीय संरक्षण संबंध आहेत. रोम आणि पॅरिस या दोन्ही शहरांमध्ये राजनाथ सिंह संरक्षण उद्योगातील कंपन्यांचे मुख्याधिकारी आणि प्रतिनिधींसोबत औद्योगिक सहकार्यातील संभाव्य संधींवर चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

टांझानियाच्या राष्ट्राध्यक्ष समिया सुलूहू हसन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यात आज नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा होणार आहे. या वेळी दोन्ही देशातले संबंध अधिक दृढ करण्याबरोबरच अनेक महत्त्वपूर्ण क्षेत्रांतले सामंजस्य करार केले जाणार आहेत.

आठ वर्षांनंतर टांझानियाचे राष्ट्राध्यक्ष भारत भेटीवर आले आहेत. तर राष्ट्राध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर श्रीमती हसन पहिल्यांदाच भारत भेटीवर आल्या आहेत. नवी दिल्ली इथं आगमन झाल्यानंतर टांझानियाच्या राष्ट्राध्यक्षांनी राजघाटावर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या समाधीस्थळाचं दर्शन घेतलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपतीभवन इथं हसन यांचं औपचारिक स्वागत केलं.

टांझानियाच्या राष्ट्राध्यक्ष हसन या उद्या नवी दिल्लीत व्यापार आणि गुंतवणूक मंचाच्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

मानवतेच्या दृष्टीकोनातून लवचिक अन्न प्रणाली तयार करण्यावर भर दिला पाहिजे आणि हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना

करण्यासाठी वेगानं कृती केली पाहिजे असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत न्याय्य अन्न प्रणालीशी संबंधित कृषी परिषदेत त्या बोलत होत्या.

कृषी उत्पादनातल्या निर्णय प्रक्रियेत महिलाच्या सहभागाला चालना देण्याची गरज असल्याचं त्या म्हणाल्या. त्यांनी जैव विविधतेचं महत्त्व त्यांनी विशद केलं. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारनं राबवलेल्या उपाययोजनांमुळे गेल्या काही वर्षात अन्नधान्य उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री नरेंद्र सिंग तोमर यांनी सांगितलं.

<><><><><><>

इस्त्रायलआणि हमासमध्ये सुरु झालेल्या संघर्षाचे पडसाद आता जगाच्या अर्थकारणावर उमटायला सुरुवात झाली आहे. यामुळे आज खनिज तेलाच्या दरात साडे चार टक्के वाढ झाली. या संघर्षात आतापर्यंत अकराशेहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

<><><><><><>

इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्धाचा परिणाम आज देशातल्या शेअर बाजारावर दिसून आला. आज मुंबई शेअर बाजाराच्या व्यवहारांना सुरुवात होताच मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात ४०७ अंकांची घसरण झाली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही १४२ अंकांची घसरण झाली. तसंच भारताच्या परकीय चलन साठ्यातही मोठी घसरण होऊन तो ३ पूर्णांक ७९४ अब्ज डॉलरवरून ५८६ पूर्णांक ९०८ अब्ज डॉलर इतका झाला आहे.

<><><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या अपात्रेबाबत जयंत पाटील यांची याचिका आणि शिवसेनेच्या आमदारांच्या अपात्रतेविषयी उद्धव ठाकरे यांची याचिका एकत्र

करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायलयानं विधानसभा अध्यक्षांना दिले आहेत. अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करणारी याचिका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर  सर्वोच्च न्यायालयानं आज हे निर्देश दिले. विधानसभा अध्यक्षांना जुलै महिन्यात निवेदन दिल्यानंतर दोनदा स्मरणपत्र पाठवूनही फुटीर आमदारांना अध्यक्षांनी जबाब नोंदवण्यासाठी बोलावलं नाही, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात केलेल्या याचिकेत निवडणूक आयोगा समोर या संदर्भात सुरू असलेल्या सुनावणीचा उल्लेख या बाबत पुढील सुनावणी 13 ऑक्टोबरला होणार आहे.

**<><><><><><>**

केंद्रीय पर्यटन मंत्री जी. किशन रेड्डी यांनी आज सिकंदराबाद स्थानकावर काझीपेठ ते हडपसर एक्स्प्रेस, बोधन-करीमनगर, रायचूर-नांदेड विस्तारित गाड्यांबरोबरच कुर्नूल-जयपूर विस्तारित ट्रेनलाही हिरवा झेंडा दाखवला. तेलंगणातल्या सर्व प्रमुख शहरांमध्ये रेल्वे सेवांचा विस्तार करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले, चेर्लापल्ली रेल्वे स्थानक येत्या जानेवारीपर्यंत तयार होणार असल्यांचं देखील त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

अफगाणिस्तानात परवा झालेल्या भुकंपात आतापर्यंत 2 हजार 400 पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे. अजुनही बरेच जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. 465 घरं पूर्णपणे उध्वस्त झाली असून, 135 घरांचं काही प्रमाणात नुकसान झालं आहे. 6 पूर्णांक 3 रिक्टर स्केल क्षमतेच्या

या भूकंपामुळे हेरात शहराच्या पश्चिमेकडील भागात जनजीवन पूर्णपणे उद्धवस्त झालं आहे, असं संयुक्त राष्ट्र संघानं सांगितलं. गेल्या दोन दशकातला हा सर्वात मोठा भूकंप आहे. गेल्यावर्षी जूनमध्ये पक्तीका प्रांतात झालेल्या भूकंपामुळे एक हजारापेक्षा जास्त जणांना आपला प्राण गमवावा लागला होता.

**<><><><><><>**

रत्नागिरीच्या संगमेश्वर तालुक्यातल्या कडवईपासून रत्नागिरीपर्यंतच्या रेल्वेमार्गावर उद्या सकाळी सात वाजून ४० मिनिटांपासून तीन तासांचा मेगा ब्लॉक घेतला जाणार असल्याचं कोकण रेल्वे प्रशासनानं प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवलं आहे.

देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठीच्या या ब्लॉकमुळे तीन गाड्या विलंबानं धावणार आहेत. त्यात आज सुटणारी तिरुनेलवेली-जामनगर एक्स्प्रेस ठोकूर ते रत्नागिरीदरम्यान तीन तास थांबवली जाणार आहे. तसंच आजच सुटणारी तिरुअनंतपुरम-लोकमान्य टिळक टर्मिनस नेत्रावती एक्स्प्रेस ठोकूर ते रत्नागिरीदरम्यान दीड तास थांबवली जाणार आहे. तसंच, उद्या सकाळी सुटणारी मुंबई-मडगाव जनशताब्दी एक्स्प्रेस खेड-चिपळूणदरम्यान २० मिनिटं थांबवली जाणार आहे.

**<><><><><><>**

सिक्किममध्ये तीस्ता नदीला आलेल्या पुरात आतापर्यंत 34 लोकांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये 10 सैनिकांचा समावेश आहे, अशी माहिती प्रशासनानं दिली आहे. 2 हजार 563 लोकांना वाचवण्यात प्रशासनाला यश आलं आहे. आतापर्यंत 6 हजार 847 लोकांना 28 मदत शिबिरांमध्ये हलवण्यात आलं आहे. या पुरात 1 हजार 381 घरं पूर्णपणे उद्धवस्त झाली आहेत. 14 पूल वाहून गेले आहेत. सैन्यदलाचं त्रीशक्ती कोअर अहोरात्र बचतकार्य करत आहेत. जवळपास सतराशे

पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात बचाव पथकाला यश आलं आहे. केंद्र सरकार सातत्यानं बचाव कार्याचा आढावा घेत आहे. दरम्यान सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांनी सैन्यदल प्रमुख मनोज पांडे, मुख्य सचीव आणि अन्य अधिकाऱ्यांबरोबर तातडीची बैठक बोलावली होती, ज्यात बचाव कार्यासोबतच पुरामुळे बाधीत झालेल्या पायाभूत सुविधांची नव्यानं बांधणी करण्यासंदर्भात चर्चा केली.

<><><><><><>

विश्वचषक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत आज नेदरलँड आणि न्यूझीलंड यांचा सामना होणार आहे. हैदराबाद इथं थोड्याच वेळात म्हणजे दुपारी दोन वाजता हा सामना सुरु होईल.

नेदरलँडनं, नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><><>//